मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०२०

# युगवाणी

## शरच्चंद्र मुक्तिबोध
### जन्मशताब्दी विशेषांक
### १९२१–२०२१



मकर संक्रांत १९२३


विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

वर्ष ७५ वे

जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०२०


# युगवाणी

शरच्चंद्र मुक्तिबोध जन्मशताब्दी विशेषांक १९२१–२०२१

**संपादक**

प्रफुल्ल शिलेदार

**संपादक**
प्रफुल्ल शिलेदार

**ऋणनिर्देश**
*मुखपृष्ठावरील तसेच आतील शरच्चंद्र मुक्तिबोध यांची छायाचित्रे श्री. प्रदीप शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या व्यक्तिगत संग्रहातून मिळाली आहेत. त्याचप्रमाणे या अंकात प्रकाशित केलेली शरच्चंद्र मुक्तिबोध यांना आलेली सगळी पत्रे आणि त्यांच्या प्रतिमा श्री. प्रदीप शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी उपलब्ध करून दिल्या आहेत. या अमूल्य सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी लिहिलेल्या पत्रांपैकी गजानन माधव मुक्तिबोध यांना लिहिलेले पत्र श्री. रमेश गजानन मुक्तिबोध, रायपूर यांनी उपलब्ध करून दिले. सतीश काळसेकरांना लिहिलेली तीन पत्रे श्री. काळसेकर यांच्या अनुमतीने श्री. जयप्रकाश सावंत यांनी उपलब्ध करून दिलीत. म. म. देशपांडे यांना लिहिलेले पत्र श्री. श्याम माधव धोंड यांनी उपलब्ध करून दिले. या सगळ्यांचे मनःपूर्वक आभार.*

**मुखपृष्ठावरील सुलेखन :** चंद्रमोहन कुलकर्णी

**संपादकीय पत्रव्यवहार**
प्रफुल्ल शिलेदार, ६अ, दामोदर कॉलनी, सुरेंद्रनगर, नागपूर - ४४० ०१५
ई-मेल : edityug@gmail.com

**प्रकाशक**
विलास मानेकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

**जाहिरात सहयोग :** प्रदीप दाते, वर्धा

**मुद्रितशोधन :** दीपक रंगारी

**अक्षरजुळणी व मुद्रण :**
माधव लोखंडे, मलय ग्राफिक्स, सुभाषनगर, नागपूर । भ्रमण : ९३२६९९९०१५

**युगवाणीच्या वर्गणीबाबत सूचना :**
- युगवाणीची वर्गणी आपण 'युगवाणी-विदर्भ साहित्य संघ' या नावाने धनादेशाद्वारे पाठवू शकता.
- युगवाणीची वर्गणी थेट बँक खात्यातही जमा करता येईल.

Bank Account :
**'YUGWANI-VIDARBHA SAHITYA SANGH'**
Bank of Baroda, Sitabuldi Branch, Nagpur
**A/c. No.: 04650100 005638**
RTGS/IFSC Code : BARB0SITABU
Fifth Character is 'ZERO'

- युगवाणीची वर्गणी संपली असल्यास नूतनीकरण अवश्य करावे.

**व्यवस्थापन :**
**वर्गणीबाबत आणि अंक नियमित मिळण्याबाबत संपर्क :**
नितीन सहस्रबुद्धे, व्यवस्थापक, युगवाणी, द्वारा : विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल,
झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२ । भ्रमणभाष : **९४२३१०३३०१**

**प्रकाशनाची कालनियतता :** त्रैमासिक (जाफेमा, एमेजू, जुऑस, ऑनोडि)

**या अंकाचे देणगी मूल्य : १०० रुपये**
**वार्षिक वर्गणी : २०० रुपये, त्रैवार्षिक वर्गणी : ५०० रुपये**
**वि.सा. संघाच्या आजीव सभासदांना युगवाणीचे अंक मिळण्याकरिता विशेष सवलतीत त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये भरणे गरजेचे आहे.**

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'युगवाणी'च्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.
- या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी महाराष्ट्र शासन, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच युगवाणीचे संपादक आणि विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी सहमत असतीलच असे नाही.

# यु ग वा णी । जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०२०

## अं त रं ग


- ***शरच्चंद्र मुक्तिबोध : साहित्यविमर्श***
  शरच्चंद्र मुक्तिबोध यांची कविता : वसंत पाटणकर/५
  शरच्चंद्र मुक्तिबोधांची समीक्षा : प्रभा गणोरकर/१८
  शरच्चंद्र मुक्तिबोधांची कविता : आशयसूत्रांच्या अनुषंगाने : नीळकंठ कदम/२५
  शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या कादंबऱ्या : साम्यवादी विचारांचा अंतर्नाद : रमेश अंधारे/३४
  शरच्चंद्र मुक्तिबोध यांचे साहित्य : काही अलक्षित वैशिष्ट्ये : अजय देशपांडे/४०
  सत्याच्या दीप्तीने उजळलेली कविता : श्याम माधव धोंड/४४

- ***शरच्चंद्र मुक्तिबोध : व्यक्तिरूपदर्शन***
  मुक्तिबोधांच्या हस्ताक्षरातील कविता /४८
  आठवणीतील बाबा : प्रदीप शरच्चंद्र मुक्तिबोध/४९
  मला दिसलेले मुक्तिबोध : अक्षयकुमार काळे/५२

- ***शरच्चंद्र मुक्तिबोध : एक अलक्षित पैलू***
  शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी लिहिलेले संस्थागीत : सुजाता व्यास/५६

- ***शरच्चंद्र मुक्तिबोध : पुनर्वाचन***
  दोन मुक्तिबोध : निशिकांत ठकार/५८
  मुक्तिबोधांचा 'मुक्ति'बोध : गो. पु. देशपांडे/६३

- ***शरच्चंद्र मुक्तिबोध : पत्रव्यवहार***
- **शरच्चंद्र मुक्तिबोधांना आलेली निवडक पत्रे**/६९
  - वि. भि. कोलते (१५ डिसेंबर १९४९) • ग. रा. कामत (२७ सप्टेंबर १९५७)
  - आ. रा. देशपांडे 'कवी अनिल' (१२ ऑक्टोबर १९५७) • विंदा करंदीकर (१८ फेब्रुवारी १९६१)
  - बाबुराव बागूल (७ फेब्रुवारी १९६८) • भालचंद्र नेमाडे (१ ऑक्टोबर १९६८)
  - द. गो. गोडसे (११ जून १९६९) • नारायण सुर्वे (२५ डिसेंबर १९७१)
  - श्री. पु. भागवत (२३ एप्रिल १९७४) • द. ग. गोडसे (२१ जून १९७८)

- ***शरच्चंद्र मुक्तिबोधांनी लिहिलेली निवडक पत्रे***/७९
  - गजानन माधव मुक्तिबोध यांना लिहिलेले पत्र (१० फेब्रुवारी १९८३)
  - सतीश काळसेकर यांना लिहिलेली तीन पत्रे (०२ ऑक्टोबर १९८०, २२ जुलै १९८२, ०४ जुलै १९८४)
  - म. म. देशपांडे यांना लिहिलेले पत्र (१५ डिसेंबर १९८३)

- ***वारसा : 'युगवाणी'तून***
  मी आणि माझे लेखन : शरच्चंद्र मुक्तिबोध/८७

- **निवडक वेचे :** दिगंबर पाध्ये/४७, दि. के. बेडेकर/५७, रणधीर शिंदे/८६, *रा. भा. पाटणकर*/९५, भा. ल. भोळे/९६

- ***शरच्चंद्र मुक्तिबोध : संक्षिप्त जीवनपट***/९३
- ***शरच्चंद्र मुक्तिबोध : साहित्यपट***/९४

- ***विदर्भ साहित्य संघ कार्यवृत्त / ९५***

# संपादकीय

**मराठी** साहित्यात आपल्या लेखनाने अमीट छाप उमटवणारे श्रेष्ठ साहित्यिक शरच्चंद्र माधव मुक्तिबोध यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने प्रकाशित होत असलेला मुक्तिबोध विशेषांक वाचकांच्या हाती सोपविताना आनंद होतो आहे.

मुक्तिबोधांचे पूर्वज महाराष्ट्रातील खानदेश सोडून मध्यप्रदेशात स्थलांतरित झाले होते. मुक्तिबोधांचा जन्म २१ जानेवारी १९२१ रोजी इंदूर येथे झाला. त्यांचे बालपण त्यांचे मोठे बंधू गजाजन यांच्यासोबत माळव्याच्या निसर्गरम्य प्रदेशात गेले. तिथेच त्यांच्यावर निसर्गाच्या आणि भाषेच्या लयीचे संस्कार झाले. त्यांच्या आईने या भावंडांना हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांमधील उत्तमोत्तम साहित्य वाचायला दिले. शिक्षण आणि पुढे नोकरीनिमित्ताने शरच्चंद्र महाराष्ट्रात परत आले. नागपुरात त्यांची मुळे रुजली. त्यांचे सगळे लेखन येथेच झाले. १९४९ साली प्रकाशित झालेल्या त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहाला, 'नवी मळवाट'ला, विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कार मिळाला. पुढे विदर्भ साहित्य संघाने या पुरस्काराचे नामकरण त्यांच्याच नावे केले आणि उत्कृष्ट कवितासंग्रहाला शरच्चंद्र मुक्तिबोध काव्य पुरस्कार दिला जाऊ लागला.

मुक्तिबोधांचे व्यक्तिमत्त्व अंतर्मुखी होते. त्यांनी आपला एकेक शब्द आपले लेखकपण पणाला लावत लिहिला. त्यांची एकूण साहित्यसंपदा तीन कवितासंग्रह, तीन कादंबऱ्या आणि तीन लेखसंग्रह एवढी मोजकीच असली तरीही त्यांची नाममुद्रा मराठी साहित्यात ठळकपणे उमटविण्यास पुरेशी ठरली. मराठी साहित्यपरंपरेचा विचार करताना या तीनही साहित्यप्रकारांत त्यांच्या लेखनाचा विचार करणे अपरिहार्य ठरावे असे लेखन त्यांनी केलेले आहे.

मुक्तिबोधांची कविता मुळात गंभीर स्वभावाची आणि ठोस वैचारिक पाया असलेली आहे. तिच्या भाषेतील लयात्मकता मोहून घेते. तीव्र राजकीय जाणिवेची कविता लिहून त्यांनी मराठी भाषेत राजकीय जाणिवेच्या कवितेकरिता पुढील पिढ्यांसाठी वाट प्रशस्त करून दिली. मात्र मराठी कवितेने मुक्तिबोधांच्या कवितेप्रमाणेच कवितेच्या मुळाशी आवश्यक असलेल्या राजकीय जाणिवेकडेही पुरेसे लक्ष दिले नाही, असे खेदानेच नमूद करावेसे वाटते. जीवनाबद्दलची जाज्वल्य निष्ठा, वैश्विकतेचे भान आणि वर्गसंघर्षाची सखोल समज असलेली ही कविता पुढे अधिकाधिक अंतर्मुख होत आत्मशोधाच्या वाटेवरून वेगळे वळण घेत आध्यात्मिकतेच्या टप्प्यापर्यंत गेलेली आपल्याला आढळून येते.

जीवनाचा तळ गाठून सत्य शोधण्याची आस धरणाऱ्या मुक्तिबोधांच्या कादंबऱ्या त्यांच्या कवितेपेक्षाही महत्त्वाच्या आहेत, असे मत काही समीक्षकांनी नोंदविले आहे. सर्जनशील लेखनासोबतच आपली साहित्याबाबतची भूमिकाही मुक्तिबोधांनी मानुषतेच्या सिद्धांतातून मांडत मर्ढेकरांच्या लयसिद्धांताच्या समांतर मांडणी केली. मानवी जीवनातील ऱ्हासाकरिता मूलभूत मानवी वृत्तीला जबाबदार न धरता सामाजिक व्यवस्थेला जबाबदार धरायला हवे ही भूमिका मांडत त्यांनी नैतिक निराशेचा उद्गार व्यक्त करणारी मर्ढेकरांची कविता ही व्यक्तिवादी मानवतावादातून निर्माण झालेली आहे असे सुचवत असतानाच मर्ढेकरांच्या निराशेमागे एक उदास आणि अगतिक माणूस उभा होता त्याचमुळे त्यांची कविता उभी राहू शकली असेही मत नोंदवले आहे. मर्ढेकरांच्या भूमिकेच्या विपरीत मुक्तिबोधांनी जीवननिष्ठ आशावादी भूमिका मांडली आणि तिचा हिरिरीने पुरस्कार केला. मुक्तिबोध हे जीवनाशी थेट जोडलेले कवी होते. त्यामुळे काळाचे ताप आणि ताण त्यांच्या कवितेतून आपल्याला दिसून येतात. समाजव्यवस्थेतील परिवर्तनावर निष्ठा ठेवत मुक्तिबोधांनी आशावादी काव्यपरंपरेची अपेक्षा केली; मात्र ती प्रत्यक्षात येऊ शकली नाही, त्याचीही त्यांनी पुढे चिकित्सा केलेली आहे.

आपल्या भाषेतील एखाद्या कवी-लेखकाचे जन्मशताब्दी वर्ष हे त्याच्या साहित्याकडे पुन्हा नव्याने आणि अलिप्तपणे पाहण्याचे निमित्त असते. पुरेसा काळ लोटला असल्याने आपण साक्षेपाने त्या लेखकाच्या साहित्याकडे आणि साहित्य परंपरेतील योगदानाकडे पाहू शकतो. त्याचप्रमाणे परंपरानिर्धारणासंबंधी काही चुका जर आपल्या हातून झालेल्या असल्या तर त्या दुरुस्त करण्याची संधीही या निमित्ताने मिळत असते. या अंगानेही मुक्तिबोधांच्या मराठी साहित्यातल्या योगदानाकडे पुन्हा एकवार पाहण्याची आणि पुनर्मूल्यांकन करण्याची गरज अधोरेखित करून हा अंक वाचकांच्या हाती सोपवीत आहोत.

**– प्रफुल्ल शिलेदार**





# शरच्चंद्र मुक्तिबोध यांची कविता

**वसंत पाटणकर**

*गीत साधें कोमलसें, हृदयाला खुलवीलसें*
*प्रेमाचा उचंबळ अनावर होईलसें गीत गा !*

(१९५७ : ६७)

**शरच्चंद्र** माधव मुक्तिबोध (१९२१-१९८४) हे स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यातील एक अग्रगण्य नाव आहे. त्यांनी कविता, कादंबरी या सर्जनशील प्रकारांमध्ये मौलिक स्वरूपाची निर्मिती केली आहे. सामाजिक दृष्टिकोनातून साहित्याचा विचार करणारे लेखक म्हणून ते प्रसिद्ध आहेत. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनदृष्टीचा कविता, कादंबऱ्या यांमधून यथार्थ आविष्कार झाला आहे. त्यांच्या 'क्षिप्रा', 'सरहद्द' आणि 'जन हे वोळतु जेथे' या तिन्ही कादंबऱ्यांमध्ये (कादंबरीत्रयात) बिशू (विश्वास) या कथानायकाच्या जीवनकथेचा विकसत जाणारा आलेख काढला जातो. या दोन प्रकारांमधील लेखनाबरोबरीनेच त्यांनी महत्त्वाचे साहित्यसमीक्षात्म स्वरूपाचे लेखनही केले आहे. 'काही निबंध' (१९६३), 'जीवन आणि साहित्य' (१९७२) आणि 'सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य' (१९७८) ही त्यांची समीक्षात्मक स्वरूपाची पुस्तके प्रसिद्ध आहेत. या संदर्भात हेही सांगावयास हवे की त्यांनी मराठी साहित्यविचारात कलावादी, स्वायत्ततावादी भूमिका नाकारणारा पूर्णपणे वेगळा, महत्त्वाचा सिद्धान्त मांडण्याचाही प्रयत्न केला आहे. तो मराठी समीक्षेत 'मानुषतेचा' सिद्धान्त म्हणून ओळखला जातो. (हिंदीतील विख्यात कवी गजानन माधव मुक्तिबोध हे त्यांचे ज्येष्ठ बंधू होत.)

प्रस्तुत लेखात शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या कवितेचा विचार करावयाचा आहे. हे खरे की त्यांच्या कवितेवर खूपच कमी लेखन झाले आहे. परंतु हे तसे आपल्या एकूण काव्यसंस्कृतीचेच दुखणे आहे. ते केवळ या विशिष्ट कवीबाबतच घडले आहे, असे म्हणता येणार नाही. मराठीतील अनेक महत्त्वाच्या कवींवर एकूणच कमी समीक्षात्मक लेखन उपलब्ध आहे. त्यामुळे ते तसे मुक्तिबोधांवरही कमी झाले आहे, यात काही आश्चर्य नाही.

प्रस्तुत लेखात मुक्तिबोधांच्या कवितेची काही ठळक वैशिष्ट्ये पाहावयाची आहेत. ही मूलत: समूहनिष्ठ, म्हणजे समाजाला प्राथम्य देणारी कविता आहे. तिचे केंद्र व्यक्ती नसून समूह आहे. येथे व्यक्तीच्या सुखदु:खांमधून एकूण समाजाच्या, समूहाच्या सुखदु:खांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे साहजिकच येथे समाज या पदावर अधिक भर आहे. अर्थात, एक गोष्ट आवर्जून सांगावयास हवी की येथे समाज या पदावर भर असला तरीही ही कविता निखळपणे आत्मनिष्ठ स्वरूपाची आहे. ती

*वसंत पाटणकर*
vasantpatankar201gmail.com
९८२०५०९२७५

वस्तुनिष्ठतेकडे, अनात्मपरतेकडे झुकणारी कविता नाही. ही कविता आंतरिकतेचा आविष्कार म्हणूनच समोर येते. परंतु हेही नमूद करावयास हवे की येथे सामाजिकतेचा आविष्कार महत्त्वाचा असल्यामुळे साहजिकच केवळ व्यक्तिगत भावभावनांचा आविष्कार केंद्रीय नाही.

दुसरी एक गोष्ट सांगावयास हवी की या कवितेत आंतरिकतेचा आविष्कार महत्त्वाचा असला तरी त्याबरोबरीनेच येथे समाज या पदावर अधिक भर आहे. त्यामुळे साहजिकच ती विशिष्ट समाजाबद्दल, त्याच्या स्थितिगतीबद्दल, आशाकांक्षांबद्दल अधिक बोलताना दिसते. हा कोणताही अमूर्त समाज नाही. तो विशिष्ट स्थलकालातील, विशिष्ट भाषेतील मूर्त समाज आहे. नेमकेपणाने सांगायचे तर स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या तत्कालीन मध्य प्रांतातील मध्यमवर्गीम मराठी समाज आहे. तो वेगवेगळ्मा समस्यांना सामोरा जाणारा, जगण्याची धडपड करणारा जिवंत समाज आहे. या समाजाचे, त्याच्या तत्कालीन सुखदु:खांचे, आशाकांक्षांचे चित्र या कवितेत ठळकपणे दिसून येते. त्या समाजाच्या परिवर्तनाचे, मूल्याभिमुख क्रांतीचे, नव्या वाटांचे, दिशांचे चित्र कवीला आकर्षित करते. परंतु या परिवर्तनाच्या वाटेवरील अनेक खाचखळगेही कवीला दिसतात. मात्र त्या वेगवेगळ्या अडथळ्यांना न जुमानताही तो वाटचाल करत राहतो. याचे मुख्य कारण त्याची विशिष्ट साम्यवादी विचारांवर, मार्क्सप्रणीत विरोधविकासाच्या सिद्धान्तावर वा विचारांवर निष्ठा आहे.

या कवीच्या विशेषांबद्दल येथे प्रारंभीच आणखी काही सांगावयास हवे. हा कवी या समाजाच्या एकूण भावभावनांशी, सुखदु:खांशी एकरूप झाला आहे. येथे समाजाच्या दृष्टीतून व्यक्तीकडे पाहिले जाते. म्हणजे असे म्हणता येईल की एका प्रकारे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व या अर्थाने व्यापक अशा समष्टीत विरघळून गेले आहे. मेथे व्मक्तीला नव्हे तर समष्टीला प्राथम्य आहे. मात्र व्यक्ती विरुद्ध समष्टी असा संघर्ष, असे द्वंद्व येथे नाही. याउलट प्राय: त्यांच्यातील एकजीवत्व, एकरूपत्वच येथे प्रत्येकाला येते. व्यक्तिस्वातंत्र्याच्या कोणत्याही अतिरेकी, अवास्तव कल्पना येथे नाहीत. त्यांच्या या नात्याचा शोध या कवितेत वेगवेगळ्या प्रकारे घेतला गेला आहे. याचा अर्थ असा नव्हे की या कवितेत यासंबंधीचे कोणतेच ताण नाहीत. येथे एकूण मानवी जगण्यातील सत् आणि असत्, शिव–अशिव, न्याय–अन्याय असा सनातन ताण, संघर्ष आहेच.

मुक्तिबोधांच्या पहिल्या संग्रहाचे शीर्षक 'नवी मळवाट' असे आहे, तर दुसऱ्या संग्रहाचे शीर्षक 'यात्रिक' आहे. एक गोष्ट स्पष्ट आहे की ही दोन्ही शीर्षके प्रवासाच्या बंधाशी संबंधित आहेत. हा एका अर्थाने कवीचा, त्याच्या जाणिवांचा आत्मिक प्रवास आहे. एके ठिकाणी नवी वाट शोधायची आहे, तर दुसऱ्या ठिकाणी त्या वाटेवरून वाटचाल करणारा यात्रिक आहे. कवीच्या निधनानंतर प्रकाशित झालेल्या तिसऱ्या संग्रहाचे शीर्षक मात्र आधीच्या दोन संग्रहांच्या शीर्षकांशी सुसंगत नाही. ते 'सत्याची जात' असे आहे. याचे कारण ते शीर्षक बहुधा प्रकाशकांनी, संपादकांनी या कवितेचा एकूण सूर पाहून दिले आहे. या तिन्ही संग्रहांतून आविष्कृत होणारी दृष्टी मात्र समाजनिष्ठ, समूहाला प्राथम्य देणारी आहे. ही सलगता आणि एकसंधता येथे स्पष्ट दिसते.

ही कविता आधी उल्लेखिल्याप्रमाणे स्थूलमानाने साम्यवादी, मार्क्सवादी दृष्टीचा आविष्कार करणारी आहे. जाता जाता हेही नोंदवावयास हवे की ज्येष्ठ बंधूंप्रमाणेच मुक्तिबोधांची कविताही मोठ्या प्रमाणात समाजाला, समष्टीला प्राधान्य देणारी आहे. येथे संवेदनांना संवेदना म्हणून महत्त्व नाही, हे या कालखंडाच्या संदर्भात आवर्जून सांगावयास हवे. कारण या कालखंडात शब्दांच्या केवळ संवेदनांगाला, शब्दांच्या क्रीडांना महत्त्व देणारी, त्याद्वारेच अनुभव उभारणारी पु. शि. रेगे प्रभृतींची कविता ठळकपणे दिसून येते. त्याप्रमाणेच कवितेतील संवेदनात्मक अंगाला महत्त्व देणाऱ्या बा. भ. बोरकर प्रभृती इतरही काही कवींच्या कविता दाखवता येतात. मुख्य म्हणजे अशा प्रकारच्या कवितेतील संवेद्यतेला महत्त्व देणारा हा कालखंड आहे.

मुक्तिबोधांच्या पहिल्या दोन संग्रहांतील कवितांमधील सूर, त्यांतील अनुभव, भावभावना या स्थूलमानाने एकमेकांच्या कमी–अधिक जवळपास जाणाऱ्या आहेत. या कवितांमधील अनुभव, भावभावना मोठ्या प्रमाणात रोमँटिक वळणाच्या आहेत. ते वळण या कवितेतील शब्दकळेत, प्रतिमाप्रतीकांत आहे; त्याचप्रमाणे ते एकूण वृत्तिविशेषांमध्येही आहे. मुक्तिबोध मार्क्सवादी दृष्टीचे आहेत, असे म्हटले की ते वास्तववादीच असतील अशी कल्पना होणे स्वाभाविक आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांची कविता पाहिली तर स्पष्टपणे प्रत्ययाला येते की या पहिल्या टप्प्यावरील कवितेत मोठ्या प्रमाणात रोमँटिक वळणच प्रभावी आहे. प्रारंभीच्या दोन्ही संग्रहांमध्ये याचा स्पष्ट प्रत्यय येतो.

मुक्तिबोधांच्या 'सत्याची जात' या अखेरच्या